Corporate Communications & Investor Relations
Head Office: LOKMANGAL, SHIVAJINAGAR, PUNE-5
TELE -020 :25614495, 25614366, 25514501 to 12 Extn. 495

# वृत्तपत्रीय निवेदन

## सोलापूर जिल्ह्यातील बचत गटांना बँक ऑफ महाराष्ट्र प्राधान्याने कर्जपुरवठा करणार !

**पुणे, 18 अक्तूबर, 2021 :** देशाच्या सार्वजनिक बँकिंग क्षेत्रातील अग्रगण्य बँक असलेली बँक ऑफ महाराष्ट्र बचतगट चळवळीच्यामागे खंबीरपणे उभी राहील असे प्रतिपादन बँक ऑफ महाराष्ट्रचे कार्यकारी संचालक श्री.ए.बी. विजयकुमार यांनी एका कार्यक्रमात बोलताना केले. ते बँकेच्या सोलापूर विभागाच्या दोन दिवसांच्या दौऱ्यावर आले होते .

बचत गटांना केलेला कर्जपुरवठा सहसा थकबाकीत जात नाही. त्यातून स्त्रिया एका बाजूने स्वावलंबी होऊन त्यांचा आत्मविश्वास वाढून सामाजिक समृद्धीही साधली जाण्याची काळजी सर्व बचत गट घेतात व त्यामुळे बँकेचीही प्रगती होते. त्यामुळे स्त्री सभासदांना स्वावलंबी करण्याच्या बचत गटांच्या प्रत्येक प्रयत्नात बँक ऑफ महाराष्ट्र त्यांना भक्कम पाठबळ देईल असेही त्यांनी नमूद केले.

ते पुढे म्हणाले की पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांनी हे वर्ष आपल्या स्वातंत्र्याचे अमृत महोत्सवी वर्ष म्हणून साजरे करण्यात येणार असल्याचे घोषित केले आहे व त्यामुळे आपल्या तळागाळातील ग्राहकांना स्वावलंबी बनविण्यासाठी त्यांना आपली सेवा पुरविण्याची संधी बँकेला प्राप्त झाली आहे. , बँकेच्या कळमण शाखेने सुमारे त्रेपन्न बचत गटांना व शेती तसेच रिटेल क्षेत्रातील ग्राहकांना या कार्यक्रमाच्या द्वारे कर्ज वाटप करण्यासाठी आयोजित केलेल्या समारंभात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

Corporate Communications & Investor Relations
Head Office: LOKMANGAL, SHIVAJINAGAR, PUNE-5
TELE -020 :25614495, 25614366, 25514501 to 12 Extn. 495

सदर कार्यक्रमास उपस्थित बँके ऑफ महाराष्ट्र च्या मान्यवर नागरिकांचा बँकेतर्फे सत्कार करण्यात आल. बँकेच्या सोलापूर झोनच्या झोनल मॅनेजर श्रीमती सुनिता भोसले , कलमण गावचे सरपंच श्री. पांडुरंग तांबे व उपसरपंच श्री सुनील पाटील हे स्वमदत बचत गटांच्या सभासदांसह उपस्थित होते. याप्रसंगी श्री विजय कुमार यांनी सोलापूर झोनचा व कळमण शाखेच्या वाटचालीचा आढावा घेतला. महाराष्ट्र राज्य ग्रामीण उपजीविका अभियानाच्या ( एम एस आर एल एम ) च्या समन्वयक श्रीमती. मीनाक्षी मडियाल यांनी आपले विचार व्यक्त करताना बँकेचे सुखद अनुभव विशद केले.

श्री विजय कुमार यांनी पंतप्रधान आवास योजनेच्या अंतर्गत कुंभारी गावातील आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांसाठी बांधण्यात येत असलेल्या आशिया खंडातील सर्वात मोठ्या बृहद गृहनिर्माण योजनेला भेट दिली व कामातील प्रगतीचा आढावा घेण्यासाठी प्रकल्प व्यवस्थापक श्रीमती अनुराधा पंती यांची भेट घेतली. कार्यकारी संचालकांनी प्रकल्पातील कामगारांशी संवाद साधून स्थलांतरित कामगारांसाठी बँकेत उपलब्ध असलेल्या विविध शासकीय लाभ योजनांचा उहापोह केला. बँक ऑफ महाराष्ट्र व ग्रामीण आवास योजना महासंघ यांचे जुने व घनिष्ठ संबंध असून आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना घरांसाठी कर्ज देण्यास बँक नेहमीच आघाडीवर असल्याचे त्यांनी नमूद केले.

बँक ऑफ महाराष्ट्रचे कार्यकारी संचालक श्री विजय कुमार यांनी आपल्या सोलापूर विभागाच्या दौऱ्याच्या दरम्यान विविध कार्यक्रमात म्हणजेच सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग व रिटेल कर्जदारांपर्यंत पोहोचण्यासाठीच्या विशेष कार्यक्रमात , तसेच सुवर्ण कर्ज सुलभपणे वितरीत होण्यासाठी बँकेच्या जुळे सोलापूर शाखेत सुवर्ण कर्ज काउंटरला भेट देऊन मार्गदर्शन केले. पंतप्रधान स्वनिधी योजनेच्या अंतर्गत क्यू आर कोड

डिजिटल बँकिंग सुविधा असलेल्या विविध पैलूंवर देखील त्यांनी या भेटीच्या दरम्यान चर्चा केली.



Corporate Communications & Investor Relations
Head Office: LOKMANGAL, SHIVAJINAGAR, PUNE-5
TELE -020 :25614495, 25614366, 25514501 to 12 Extn. 495

**कार्याक्रमाच्या छायाचित्रात बँक ऑफ महाराष्ट्रचे कार्यकारी संचालक श्री विजय कुमार हे बँकेच्या कळमण शाखेत झालेल्या स्वबचत मदत गटांच्या मेळाव्यात समर्थ महिला बचत गट यांना रु ५.०० लाख रकमेचा कर्ज वितरण धनादेश सुपूर्द करताना. छायाचित्रात त्याच्या डावीकडे बँकेच्या सोलापूर विभागीय कार्यालयाच्या विभागीय व्यवस्थापक श्रीमती सुनिता भोसले व डावीकडे बँकेच्या सोलापूर विभागीय कार्यालयाचे उपविभागीय व्यवस्थापक श्री हेमंत महाजन**

.